# .. bhImarUpI stotra 4 ..

## ॥ भीमरूपी स्तोत्र ४ ॥

अंजनीसुत प्रचंड । वज्रपुच्छ कालदंड ।
शक्ति पाहता वितंड । दैत्य मारिले उदंड ॥ १
धगधगी तसि कळा । वितंड शक्ति चंचळा ।
चळचळितसे लिळा । प्रचंड भीम आगळा ॥ २
उदंड वाढला असे । विराट धाकुटा दिसे ।
त्यजून सूर्यमंडळा । नभात भीम आगळा ॥ ३
लुलीत बाळकि लीळा । गिळोनि सूर्यमंडळा ।
बहूत पोळता क्षणी । थुंकिला तो ततक्षणी ॥ ४
धगधगीत बूबळा । प्रत्यक्ष सूर्यमंडळा ।
कराळ काळमूख तो । रिपुकुळासि दुःख तो ॥ ५
रुपें कपी अचाट हा । सुवर्ण कट्ट कासतो ।
फिरे उदास दास तो । खळास काळ भासतो ॥ ६
झळक झळक दामिनी । वितंड काळ कामिनी ।
तयापरि झळाझळि । लुलित रोमजावळी ॥ ७
समस्त प्राणनाथ रे । करी जना सनाथ रे ।
अतूळ तूळणा नसे । अतूळ शक्ति विलसे ॥ ८
रुपे रसाळ बाळकु । समस्त चित्त चाळकु ।
कपी परंतु ईश्वरु विशेष लाधला वरू ॥ ९
स्वरुद्र क्षोभल्यावरि । तयासि कोण सांवरी ।
गुणागळा परोपरी । सतेज रूप ईश्वरी ॥ १०
समर्थ दास हा भला । कपीकुळात शोभला ।
सुरारिकाळ क्षोभला । त्रिकूट जिंकिला भला ॥ ११
॥ श्रीराम ॥

Encoded and proofread by Hrishikesh Vidyadhar Ganu
hrishikeshv10 at Imklive.com

Please send corrections to sanskrit@cheerful.com
Last updated July 20, 2014
From http://sanskritdocuments.org .
The text is prepared by volunteers and is to be used for personal study and research. The file is not to be copied or reposted for promotion of any website or individuals or commercial purpose without permission.



From http://sanskritdocuments.org